# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## कृषि संशोधन केंद्र, अचलपूर

दुरध्वनी क्र. ०७२२३/२२०११ E-mail - arsachalpur@gmail.com

जा.क्र. कृसंके/अचल/प्रक्षेत्र / ४८ /२०२५ दिनांक- ०२ / ०५ /२०२५

निविदा सुचना

प्रति,

................................

................................

................................

**विषय - कृषि संशोधन केंद्र, अचलपूर येथील प्रक्षेत्रावरील ट्रॅक्टरच्या मशागतीचे कामे प्रति एकर/वाहतुकीसाठी चालकाद्वारे बाहय पध्दतीने काम करण्याबाबत...**

कृषि संशोधन केंद्र, अचलपुर येथील प्रक्षेत्रावरील ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतीच्या मशागतीचे विविध कामे प्रति एकर दर प्रमाणे बाहय पध्दतीने करण्याबाबत. कृषि संशोधन केंद्र, अचलपूर च्या प्रक्षेत्रावरील शेतकामाकरिता खालील नियम व अटी प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रक्षेत्रावरील कामाचा तपशिल | दर प्रति एकर/प्रति दिवस जाणे-येणे |
|---|---|---|
| १ | नांगरट करणे -<br>१.दोन फाडीने पलटी नांगर | |
| | २.तीनफाडी | |
| २ | व्हीपास मारणे | |
| ३ | पटटीपास मारणे | |
| ४ | रोटाव्हेटर मारणे (मोठे) | |
| ५ | पेरणी करणे | |
| ६ | डवरणी करणे | |
| ७ | फंटावाही करणे | |
| ८ | पंजीवाही करणे | |
| ९ | ट्रॅक्टर ट्रॉलीने माल वाहतूक करणे. (धान्य/बियाणे)<br>१.अचलपूर ते अकोला | |
| | २.अचलपूर ते अमरावती | |
| | ३.अचलपूर ते वणीरंभापूर | |
| १० | प्रक्षेत्रावरील सोंगणी केलेल्या पिकांची उचल करुन खळयावर पोहचविणे, धान्य गोडावून पर्यंत वाहतूक करणे, शेणखत वाहतूक करणे (ट्रॉलीलावून भरुन होईपर्यंत थांबणे.) | |

**निविदा पुरविण्याची अटी व शर्ती -**

१. निविदा सोबत दिलेल्या नमुन्यात मोहरबंद लिफाफयामध्ये दिनांक १३ / ०५ /२०२५ पर्यंत (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) सादर करावीत.

२. लिफाफयाच्या डाव्या बाजूस स्पष्ट अक्षरात निविदा सुचना मध्ये नमुद केलेल्या विषय नमुद करावा तसेच दर पत्रकामध्ये या कार्यालयाचा संदर्भ पत्र क्र. कृसंके/अचल/प्रक्षेत्र/४७/२०२५ व दिनांक १३/०५/२०२५ नमुद करावे.

३. कामाच्या कायदेशिर दायित्वाची इत्यादीची जबाबदारी संबंधित निविदा धारकाची असेल कुठल्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती अथवा शारीरिक हानी उदा. वीज पडणे, साप चावणे, अपघात, व शेतीस अनुसरुन इतर इजा इत्यादीबाबत हे कार्यालय कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही/स्विकारणार नाही.

४. प्रक्षेत्रावरील ट्रॅक्टरच्या मशागतीचे कामे करण्याकरिता या केंद्रावरील उपलब्ध ट्रॅक्टर/ट्रॉलीची मशागतीसाठी अवजारे व त्याला लागणारे इंधन पुरविण्यात येईल.

५. काम अपुर्ण अवस्थेत सोडून दिल्यास कामाचा मोबदला दिल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

६. समान दरपत्रके व दर आढळून आल्यास यापूर्वी केलेल्या काम आणि अनुभव यांना प्राधान्य देण्यात येईल व याबाबतचे सर्व अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता यांचे असतील.

७. कोणतीही निविदा पुर्णपणे अंशतः स्विकारणे किंवा आलेल्या सर्व दरपत्रके नाकारणे यांचे अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता तसेच गठीत समिती यांचे असतील.

८. संबंधित दर हे संपूर्ण आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी स्थापित असतील.

९. काही तांत्रिक अथवा कार्यालयीन कारणास्तव देयके अदा करण्यास उशीर झाल्यास संबंधित निविदा धारकास लागणारे देयके अदा करण्याची स्वतः जबाबदारी राहील तसेच काम करणा-याच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर राहणार नाही. त्याबाबत कोणत्याही प्रकारचे दस्तऐवज या कार्यालय मार्फत मिळणार नाही. तसेच लागणारी निविष्ठा (उदा. ट्रॅक्टर ट्रॉली, लागणारे अवजारे व इंधन इ.) कार्यालयामार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर कामाबाबत रु १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरीकडे करारनामा करुन देण्यात दयावा लागेल. रु. १००/- चा स्टॅम्प निविदा धारकास आणावा लागेल.

१०. ट्रॅक्टरची मशागतीची कामे चालू असतांना ट्रॅक्टर पंचर होणे, डिझेल संपणे, किंवा किरकोळ दुरुस्तीची कामे असल्यास पंचर काढून आणणे, डिझेल भरुन आणणे व किरकोळ दुरुस्तीसाठी वर्कशॉपवर नेणे इत्यादी कामे करावी लागतील यासाठी कोणताही जास्तीचा मोबदला मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

११. कार्यालयीन ट्रॅक्टर प्रक्षेत्र व कार्यालयीन कामाव्यतिरिक्त कुठेही बाहेर नेता येणार नाही.

१२. काम सुरु असतांना ट्रॅक्टर मध्ये किंवा औजारात बिघाड झाल्यास दुरुस्त होईपर्यंत किंवा पावसाने इत्यादी कामात खंड पडल्यास किंवा काम कमी झाल्यास त्याची भरपाई इतर स्वरुपात मिळणार नाही.

१३. जड वाहतुकीचा परवाना नुतनीकरण केलेला असावा. व त्याची छायांकित (सत्यप्रत) प्रत दरपत्रकासोबत जोडण्यात यावी.

१४. दर पत्रके मंजुर करणे अथवा काम समाधानकारक न केल्यास सदर करार रद्द करणे याबाबतचे सर्व हक्क समितीने स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

१५. या प्रक्षेत्रावरील कोणतेही साहित्य, निविष्ठा व इतर उत्पादने कोणत्याही सबबीवर बाहेर नेता येणार नाहीत.

१६. या दर प्रक्रीयेत अथवा कामाच्या बाबतीत न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास अचलपूर न्यायालयात चालेल.

१७. संबंधित निविदा धारकांनी वरील नियम व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र सही, नाव व पुर्ण पत्त्यासह व मोबाईल नंबर सह दरपत्रक सोबत सादर करावेत.

१८. निविदा कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी १० ते ५ पर्यंत स्विकारल्या जातील.

१९. कामाचा आदेश प्राप्त झाल्यापासून ३ दिवसात काम सुरू करावे लागेल.

२०. काम झाल्यानंतर उधारी देयक दोन प्रतिमध्ये देण्यात यावे.

प्रभारी अधिकारी,
कृषि संशोधन केंद्र, अचलपूर